


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०१ ● अंक : १८७ ● शनिवार, दि. १३ एप्रिल २०२४ ● टी.सी.नं. - एमएएचएमआर५२३२५ ● एसडीएम नं. - एसडीएम/एसआर.६०/२०२३ ● पुणे ● मराठी दैनिक (रविवार सोडून) ● पाने ४ ● किंमत : २ रूपये
● Volum : 1 ● Issue : 187 ● Saturday, 13 April 2024 ● Title Code. - MAHMAR52325 ● SDM No. SDM/SR/60/2023 ● Pune ● Marathi Dainik (Monday To Saturday) ● Page : 4 ● Price : 2 Rs/-

## नेतृत्व चांगले तर लोक चांगले, मतदान करणं आपलं कर्तव्य

### विकसित भारतावर श्री श्री रविशंकर स्पष्ट बोलले



**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

मुंबईत ॲन इव्हनिंग ऑफ म्युझिक अँड मेडिटेशन विथ विकसित भारत ॲम्बेसेडर हा कार्यक्रम पार पडला. यावेळी अध्यात्मिक गुरू श्री श्री रविशंकर यांनी संबोधित केले. यावेळी त्यांनी मतदान करण्याचे आवाहन केले. एक नागरिक म्हणून निवडणुकीच्या वेळी मतदान करणं हे आपलं कर्तव्य आणि जबाबदारी असल्याचे श्री श्री रविशंकर म्हणाले. "नेतृत्व चांगले असेल तर लोक चांगले असतात. जशी दूरदृष्टी असते, तशीच निर्मितीही असते. पण त्यासाठी वेळ लागतो. हे सगळं एका रात्रीत घडेल असं तुम्ही गृहीत धरू शकत नाही. समस्या असतील... पण तुम्ही सकारात्मक विचारसरणीने पुढे जा...", असे रविशंकर म्हणाले. श्री श्री रविशंकर म्हणाले,ते म्हणाले की विकसित भारत प्रथम आपल्यापासून सुरु होतो. आपले मन किती विकसित आहे आणि आपण किती आनंदी आहोत हे महत्त्वाचे आहे. विकासात काय सामील आहे? आनंद... आपण आपल्यात काय विकसित होत आहे याकडे लक्ष देतो. ते काय आहे, आपली जाणीव आहे, तणाव असेल तर चैतन्य विकसित होऊ शकत नाही. जेव्हा तणाव दूर होईल तेव्हाच तुम्ही विकसित व्यक्तिमत्व आणि विकसित भारताचा विचार करू शकता. त्यामुळे आपल्या जीवनशैलीत बदल व्हायला हवा. जगात दर 40 सेकंदाला एक व्यक्ती आत्महत्या करत आहे. तीनपैकी एक व्यक्ती डिप्रेशनमध्ये जात आहे. या सर्व आजारातून बाहेर पडण्यासाठी ध्यान आणि योगासने आवश्यक असल्याचे रवीशंकर म्हणाले.

# गणेशखिंड रस्ता रुंदीकरणासाठी भूसंपादन

# कायद्यानुसार जागा ताब्यात घेण्याचे काम युद्धपातळीवर

### मेट्रो प्रकल्प आणि विद्यापीठ चौकातील उड्डाणपुलाचे काम वेळेत पूर्ण होईल – महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गणेशखिंड रस्ता रुंदीकरणासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या खाजगी व शासकिय जागांचे भूसंपादन करण्यासाठी महापालिका प्रशासनाने महत्वपूर्ण पाउल उचलले आहे. रस्ता रुंदी आणि मेट्रो स्टेशनच्या जिन्यांसाठी आवश्यक जागेसाठी तडजोडीने भूसंपादन करण्यास जागा मालकांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने प्रशासनाने भूसंपादन कायद्यानुसार भूसंपादन करण्यासाठी प्रशासनाने जागा मालकांना नोटीसेस बजावत पुढचे पाउल उचलले आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांनी दिली.




पीएमआरडीएच्यावतीने गणेशखिंड रस्त्यावर हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गीकेचे काम सुरु आहे. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकामध्ये दुमजली उड्डाणपुल उभारण्यात येणार आहे. या कामामुळे सध्या अस्तित्वात असलेल्या 35 मी. रुंद गणेशखिंड रस्त्याचे विकास आराखड्यानुसार 45 मी. रुंदीकरण करण्यात येत आहे. तसेच या मार्गावरील मेट्रो स्टेशनच्या जिन्यांसाठी काही खाजगी जागाही लागणार आहे.

मेट्रो मार्गीका आणि उड्डाणपुलाच्या कामामुळे रस्त्यासाठी जागा कमी पडत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर महापालिकेने रस्ता रुंदीकरणासाठी पावले उचलली आहेत. संचेती चौक ते चाफेकर चौकादरम्यान दोन्ही बाजूला प्रामुख्याने रस्ता रुंदीसाठी अडथळे येत आहेत. या रस्त्याच्या दुतर्फा शासकिय संस्था तसेच खाजगी मिळकती आहेत. आवश्यक असलेली जागा तडजोडीने भूसंपादनासाठी महापालिका प्रशासनाने वेळोवेळी प्रयत्न केले आहेत. प्रामुख्याने टीडीआर, एफएसआयच्या माध्यमातून भूसंपादनासाठी प्रयत्न झाले आहेत. परंतू संबधित मिळकतधारकांनी तडजोडीने जागा ताब्यात देण्यास नकार दिला आहे.या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने अत्यावश्यक नागरी सुविधांसाठी भूसंपादन कायद्यानुसार जागा ताब्यात घेण्यासाठी सविस्तर प्रस्ताव तयार केला आहे. यामध्ये रस्ता रुंदीकरणासाठी आवश्यक सुमारे 14 हजार चौ.मी. जागा आणि त्यांचे मालक याची माहिती एकत्रित केली आहे. भूसंपादनासाठी अपेक्षित खर्च सुमारे 141 कोटी रुपयांचा अंदाजही तयार केला आहे. यासंदर्भातील प्रस्ताव स्थायी समितीपुढे ठेवण्यात आला आहे. अत्यावश्यक नागरीसुविधांसाठी प्रशासन कुठलिही जागा ताब्यात घेउ शकते या कायद्यातील तरतुदीनुसार प्रशासन कामाला लागले आहे.

> शासकिय व निमशासकिय संस्थांशी उच्च स्तरावर बोलणी करून टीडीआर अथवा एफएसआयच्या मोबदल्यात भूसंपादन करण्याचा आमचा प्रयत्न राहील, असे महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांनी नमूद केले. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता शिथिल होताच भूसंपादनाची कार्यवाही सुरू करण्यात येईल. मेट्रो प्रकल्प तसेच उड्डाणपुलाचे काम वेळेत पुर्ण करण्यासाठी महापालिका प्रशासन आवश्यक ते प्रयत्न करेल.





# राजकीय संशयकल्लोळ



देशामध्ये सध्या 18व्या लोकसभेसाठी होत असलेल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या निमित्ताने युती, महायुती, आघाडी, मैत्रीपूर्ण लढत, बंडखोरी, नाराजी, मातब्बरांचे तिकीट कापले जाणे, महत्त्वाचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते अचानक ‘नॉट रिचेबल’ होणे अशा विविध घडामोडींनी राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. लोकसभा निवडणुकीच्या माध्यमातून देशाच्या कानाकोपऱ्यांत लोकांशी संपर्क करण्यासाठी, आपल्या उमेदवाराला विजयी करण्यासाठी प्रचारसभा, निवडणूक रॅली, कॉर्नर सभा आदी घडामोडी गतिमान झाल्या आहेत. नेहमीच बंद असणारी पक्षाची कार्यालयेही आता उघडी दिसू लागली आहेत. निवडणुका म्हटल्यावर आयाराम-गयाराम संस्कृती याच काळात फोफावते आणि निवडणूक संपल्यावर पुन्हा ही संस्कृती थंडावते. सध्या होत असलेली निवडणूक ही भाजपा व मित्रपक्षांसाठी तसेच काँग्रेस व त्यांच्या मित्रपक्षांसाठी प्रतिष्ठेची आहे. पण या प्रतिष्ठेतही कमालीचा फरक आहे. भाजपाला केंद्रात सलग तिसऱ्यांदा सत्तेत येऊन पंतप्रधानपदी नरेंद्र मोदींना विराजमान करायचे आहे. आपण निवडणूक जिंकणार व पुन्हा सत्ता संपादन करणार, असा विश्वास भाजपा व त्यांच्या मित्रपक्षांमध्ये पाहावयास मिळत आहे. या विश्वासामुळे निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्यापूर्वी, आचारसंहिता लागण्यापूर्वीच काही महिने अगोदर ‘अब की बार, चार सौ पार’ हा नारा भाजपाकडून देण्यात आला आहे. एकीकडे भाजपा आघाडीत आत्मविश्वास असून प्रचारयंत्रणेवरही त्याचा प्रभाव पाहावयास मिळत आहे. दुसरीकडे काँग्रेस व मित्रपक्षांची असलेली इंडिया आघाडी प्रारंभापासूनच अडखळत चालली आहे. काँग्रेसच्या सोबत असलेले मित्रपक्ष भाजपाकडे निघून गेले आहेत आणि आता सोबत असणारे मित्रपक्ष काँग्रेसला फारसे जुमानत नसल्याचे पंजाब, दिल्ली, उत्तर प्रदेशमधील घडामोडींदरम्यान पाहावयास मिळाले आहे. एकेकाळी अनेक वर्षे देशाच्या लोकसभेत व विविध राज्यांच्या विधानसभेत सत्ता उपभोगणाऱ्या काँग्रेसवर आज मित्रपक्ष त्यांचा प्रभाव असणाऱ्या राज्यांमध्ये देतील त्या जागा लढविण्यावर समाधान मानण्याची वेळ आली आहे.

महाराष्ट्रातही लोकसभा निवडणुकीचा ज्वर चांगलाच चढला आहे. महाराष्ट्रात मविआ आणि महायुतीमध्ये निकराचा संघर्ष होत आहे. महायुती असो अथवा मविआ, दोन्ही गटांकडून प्रत्येक जागेवर विचारपूर्वक उमेदवार दिला जात आहे. मित्रपक्ष विचारविनिमय करूनच जागा ठरवत आहे. त्यामुळे सातारा, ठाणे व अन्य जागांवरील उमेदवार अजून जाहीर झालेले नाहीत. केवळ खासदार सतत निवडून येतोय म्हणून परत द्या त्यालाच तिकीट, हे सूत्र या निवडणुकीत पाहावयास मिळत नाही. शिवसेनेने सलग पाच वेळा लोकसभा निवडणूक जिंकणाऱ्या भावना गवळी यांचे तिकीट कापले. खासदार भावना गवळी या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना राखी बांधत आहेत. स्वत: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेही भावना गवळी यांना बहीण मानतात. तथापि केंद्रात सत्ता संपादन करण्यासाठी प्रत्येक जागा महत्त्वाची असल्याने पंतप्रधान व मुख्यमंत्री ज्यांना बहीण मानतात, त्या भावना गवळींचे शिवसेनेने पर्यायाने महायुतीने तिकीट कापल्याने ही निवडणूक महायुतीने हलक्यात घेतली नसल्याचे या कृतीतून पाहावयास मिळत आहे. महायुतीत व मविआमध्ये एक फरक महाराष्ट्रीय जनतेला या निवडणुकीत जवळून पाहावयास मिळाला आहे. तो म्हणजे तिकीट नाकारले, जागावाटपात जागा मिळाली नाही म्हणून महायुतीत किरकोळ नाराजी वगळता फारसा गोंधळ झालेला दिसत नाही. या उलट मविआमध्ये मात्र नाराजीनाट्य मोठ्या प्रमाणावर उफाळून आले आहे.

रामदास आठवले यांचा आरपीआय, सदाभाऊ खोत यांचा पक्ष हे लोकसभा तिकिटीसाठी इच्छुक असतानाही त्यांना महायुतीत जागा मिळाल्या नाहीत म्हणून त्यांनी कोणत्याही प्रकारचे राजकीय आकांडतांडव केले नाही. याउलट मविआमध्ये सध्या सांगली व मुंबई तसेच भिवंडी जागेवरून जोरदार वाद निर्माण झाला असून राजकीय कलगीतुरा सुरू आहे. हा वाद काँग्रेस आणि उबाठा शिवसेनेतच सुरू झाला आहे. मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड यांचे नॉट रिचेबल होणे, पक्षाचे पदाधिकारी भेटायला गेल्यावर त्यांची भेट नाकारणे असे प्रकार सुरू झाले आहेत. मविआत जागावाटप जाहीर झाल्यावरही सांगलीच्या जागेसाठी काँग्रेसने आग्रही राहणे, तेथील स्थानिक नेत्यांनी पत्रकार परिषद घेत आपला दावा कायम ठेवणे, काहींनी वंचितच्या प्रकाश आंबेडकरांची भेट घेणे असे प्रकार सुरू झाल्याने महायुतीत शांतता असली तरी जागावाटपावरून मविआमध्ये सर्व काही आलबेल नसल्याचे पाहावयास मिळाले आहे. अर्थात निवडणुका म्हटल्यावर रुसवे-फुगवे, मनधरणी हे प्रकार होतच असतात. प्रत्येकालाच आपले राजकीय शक्तिप्रदर्शन करायचे असते. निवडणुकांच्या माध्यमातून राजकीय उपद्रवमूल्य दाखवून द्यायचे असते. पण ते पेल्यातीच वादळ ठरवायचे असते, त्याचा स्फोट करायचा नसतो. अर्थात याची झळ अमरावतीच्या माध्यमातून महायुतीलाही बसली आहे. अमरावतीत महायुतीतील मित्रपक्ष असलेल्या बच्चू कडू यांनी भाजपा उमेदवार नवनीत राणा यांच्याविरोधात आपला उमेदवार उभा केला आहे. कोल्हापूरची जागा मविआत काँग्रेसला गेल्याने सांगलीच्या जागेसाठी शिवसेना उबाठाने उमेदवार जाहीर केला व जागावाटप घोषित होण्यापूर्वीच शिवसेना उबाठाच्या उमेदवाराने आपला प्रचारही सुरु केला आहे. कोल्हापूर व सांगली या दोन्ही जागा काँग्रेसला देणे म्हणजे मविआचे अन्य मित्रपक्ष या भागात नगण्य असल्याचा संदेश गेला असता. मुळातच काँग्रेसने आकांडतांडव करत मविआला अडचणीत आणणे योग्य नाही. सांगली वसंतदादा पाटील यांचीच असा टाहो आज काँग्रेस फोडत असली तरी त्या ठिकाणी भाजपाचा खासदार आहे. वसंतदादांची सांगली म्हणणाऱ्या काँग्रेसला ही जागा टिकविता आली नसल्याचे सत्य काँग्रेसलाही नाकारता येणार नाही. मुंबई, ठाणे, भिवंडी व अन्य जागांवर भाजपाचे खासदार असताना त्याही जागा काँग्रेसने प्रतिष्ठेच्या केल्या आहेत. अर्थात उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वी हे वादळ शमेल. काँग्रेसमध्ये नाराजी व्यक्त करण्याचा अधिकार आहे. पण हेच काँग्रेसचे घटक हायकमांडचा आदेश नाकारण्याचे धाडस दाखवू शकत नाही. सध्या लोकसभा निवडणुका काँग्रेससाठीही प्रतिष्ठेच्या असल्याने मविआतील मित्रांना दुखावणे काँग्रेसला परवडणारे नाही.

# बंधुतेचा, मानवतेचा विचार विश्वव्यापी होण्यासाठी प्रयत्नशील

- बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांचे प्रतिपादन
- पहिल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विश्वबंधुता पुरस्कारांचे वितरण
- ॲड. जयदेव गायकवाड, नलिनी व्यंकटराव व भारतीय जैन संघटनेच्या कार्याचा पुरस्काराने गौरव



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"मानवी मूल्यांचे अधःपतन होत असताना बंधुतेचा, मानवतेचा विचार दिशा देण्याचे व सर्वांना एकसंध ठेवण्याचे काम करतो. संपूर्ण विश्वाला एकतेचा संदेश देणारा हा विचार स्वार्थी राजकारणामुळे सर्वत्र दुफळी माजत असतानाच्या काळात आश्वस्त करतो. त्यामुळे बंधुतेचा व मानवतेचा हा विचार पेरत ही चळवळ विश्वव्यापी करण्यासाठी प्रयत्नशील आहे," असे प्रतिपादन राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांनी केले.

पहिल्या विश्वबंधुता साहित्य संमेलनाचा समारोप व 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर विश्वबंधुता पुरस्कार' वितरण नवी पेठेतील एस. एम. जोशी सभागृहात ज्येष्ठ साहित्यिक व संमेलनाध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस आणि प्रकाश रोकडे यांच्या हस्ते झाले. राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषद, बंधुता प्रतिष्ठान, काषाय प्रकाशन, रयत शिक्षण संस्थेचे औंध येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, भोसरी येथील भगवान महावीर शिक्षण संस्थेचे प्रीतम प्रकाश महाविद्यालय आणि भारतीय जैन संघटनेचे वाघोली येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने या संमेलनाचे आयोजन केले होते.

आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते, माजी आमदार व साहित्यिक ॲड. जयदेव गायकवाड, सिकंदराबाद (तेलंगणा) कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या ज्येष्ठ सदस्या नलिनी व्यंकटराव पणसा आणि भारतीय जैन संघटनेचे वाघोली येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रसंगी भारतीय जैन संघटनेचे सुरेश साळुंखे, विलास राठोड, प्राचार्य डॉ. संजय गायकवाड, डॉ. अशोककुमार पगारिया, औंध येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण आंधळे, कवी प्रा. चंद्रकांत वानखेडे, संगीता झिंझुरके, मधुश्री ओव्हाळ आदी उपस्थित होते.

प्रकाश रोकडे म्हणाले, "गेली 50 वर्षे बंधुतेची चळवळ समर्पित भावनेने सर्वदूर नेली आहे. या प्रवासात अनेक चांगली माणसे, संस्था जोडल्या आहेत. आजच्या अस्थिरतेच्या काळात हा मानवतावादी व करुणेचा विचार भगवान महावीर व भगवान गौतम बुद्धांचा वारसा सांगतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या राज्यघटनेतील स्वातंत्र्य, समता व बंधुता ही मूल्ये एकमेकांपासून वेगळे करता येत नाहीत. बंधुतेशिवाय स्वातंत्र्य व समतेचे मूल्य सत्यात उतरू शकत नाही."

डॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले, "अनेक संमेलने, कार्यक्रम होतात. मात्र, बंधुतेच्या ध्यासपीठावरील प्रयोग नाविन्यपूर्ण आणि जाती-धर्मापलीकडे जाऊन केवळ माणूस म्हणून एकमेकांना जोडणारे असतात. निःस्वार्थ भावनेने बंधुतेची ही मशाल तेवत असून, या विचाराने एकदा जोडलेला माणूस चळवळीपासून दूर जात नाही. जातीभेदाचे जोखड आपण बाजूला करून प्रत्येकाचा सन्मान व त्याची प्रतिष्ठा जपायला हवी. त्यातूनच माणूस म्हणून आपण एकमेकांशी घट्टपणे जोडले जाऊ शकतो."

सुरेश साळुंखे, विलास राठोड यांनी मनोगतात भारतीय जैन संघटनेच्या कार्याविषयी सांगितले. स्वागत-प्रास्ताविक डॉ. डॉ. अशोककुमार पगारिया यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. शंकर आथरे यांनी केले. डॉ. संजय गायकवाड यांनी आभार मानले. प्रा. प्रशांत रोकडे, डॉ. प्रभंजन चव्हाण, प्रा. सदाशिव कांबळे आणि डॉ. सहदेव चव्हाण यांनी संमेलनाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# थोडक्यात




## 'दी डॉग्ज सेपरेशन' हा सस्पेन्स थ्रीलर चित्रपट लवकरच भेटीला

**पुणे (आरंभ पर्व) :** कोरोना महामारी आली अन् आख्या जगाला हलवून गेली. या महामारीत अनेक सामान्य नागरिकांनी आपले प्राण गमावले. मात्र ही कोरोना महामारी नैसर्गीक नसून ती मानव निर्मित असल्याचा दावा लेखक, दिग्दर्शक सुवदन आंग्रे यांनी विविध पुराव्यांच्या आधारे केला आहे. याच धर्तीवर आंग्रे यांनी 'दी डॉग्ज सेपरेशन" हा सत्य घटनेवर आधारीत सस्पेन्स थ्रीलर हिंदी चित्रपट तयार केला असून लवकरच तो प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. 'डीप सी मुव्हीज'ची निर्मिती असलेल्या 'दी डॉग्ज सेपरेशन'या चित्रपटाचे लेखन, दिग्दर्शक सुवदन आंग्रे यांनी केले आहे. याविषयी अधिक माहिती देताना ते म्हणाले, कोरोना महामारीने संपूर्ण जागावर व परिणामी नागरिकांवर खोलवर परिणाम केले आहेत. कोरोना नंतर जसे चांगले बदल झाले तसेच काही वाईट परिणाम देखील झाले. घटस्फोट घेण्याकडे, एकटे राहण्याकडे तसेच विना आपत्य वैवाहिक आयुष्य जगण्याकडे लोकांचा कल वाढला आहे; असे जागतिक आकडेवारी वरून सिद्ध आले आहे. अन् याच मुद्द्यावर 'दी डॉग्ज सेपरेशन' हा चित्रपट भाष्य करतो. या चित्रपटासाठी रिसर्च करताना अशा अनेक बाबी लक्षात आल्या की ज्यावरून असे दिसून येते की 'वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायसेशन' (WHO) ला या महामारीबद्दल आगोदार पासून माहिती होती अन् त्यांनी यासाठी एक प्रोग्राम देखील राबविला होता. अशा अनेक सत्य घटनांचा संदर्भ घेत कोरोना महामारी कशी नैसर्गीक नसून ती मानव निर्मित आहे, हे समजावून सांगण्याचा हा चित्रपट प्रयत्न करतो, असे ही दिग्दर्शक सुवदन आंग्रे यांनी सांगितले. एका हाय प्रोफाईल घटस्फोटा पासून सुरु होणारी ही कथा आहे. जी मायक्रोसॉफ्ट चे सर्वेसर्वा बिल गेट्स यांच्या घटस्फोटाशी मिळती जुळती आहे. पुढे ही कथा कोणत्या वळणावर कशा प्रकारे या सत्य घटनांचा खुलासा करत पुढे जाते, हे पाहणे नक्कीच औत्सुक्याचे ठरणार आहे. हा चित्रपट हिंदी भाषेत तयार करण्यात आला असून याला इंग्लिश सबटायटल असणार आहेत. तसेच यामध्ये अभिनेता आदित्य अलंकार, लीना नंदी, मिथिला नाईक, त्रिशन कुमार, केतन महाजन, नूपुर पंडित, निखिल घमरे, शुभम साखरे, तनिष्क खन्ना, दीपक जोशी, सुवदन आंग्रे, रोहन लोलगे, अभिर आणि आयुष चिंचाळकर आणि जिमी-द डॉग आदी कलाकारांनी काम केले आहे. संगीत संगीतकार युग भुसाळ यांचे असून निर्माती म्हणून दीपाली आंग्रे यांनी जबाबदारी पेलली आहे.

## ओरिएंट इलेक्ट्रिकतर्फे उच्च क्षमतेच्या एअर कूलर्स श्रेणीत वाढ

**पुणे (आरंभ पर्व) :** ओरिएंट इलेक्ट्रिक लिमिटेड या वैविध्यपूर्ण 2.9 बिलियन अमेरिकन डॉलर्स सीके बिर्ला ग्रुपचा भाग असलेल्या कंपनीने डिसर्ट व कमर्शियल श्रेणींमध्ये नवीन उच्च क्षमतेच्या मॉडेल्सच्या भरीसह एअर कूलर्सची व्यापक लाइन-अप वाढवली आहे. मोठी टँक क्षमता, प्रगत वैशिष्ट्ये आणि उच्च दर्जाची कार्यक्षमता असलेले हे उच्च-क्षमतेचे कूलर्स मोठ्या जागांची आणि अधिक कूलिंग गरजांची पूर्तता करतात. कंपनीने या सीझनमध्ये एअर कूलर्समध्ये दोन-अंकी उच्च वाढीवर लक्ष केंद्रित केले आहे. ओरिएंट इलेक्ट्रिक लिमिटेडच्या ईसीडीचे व्यवसाय प्रमुख गौरव धवन म्हणाले की, "हवामान तज्ञांनी यंदा उन्हाळ्यामध्ये तापमान अधिक वाढण्यासह उष्णतेची लाट येण्याचे भाकित केले असताना आम्हाला एअर कूलर्ससाठी मागणी वाढण्याची अपेक्षा आहे. आम्ही आज देशातील या विभागामधील सर्वाधिक विक्री होणारा ब्रँड आहोत, तसेच प्रत्येक गरजा व जागेची पूर्तता करण्यासाठी विविध आकार, क्षमता व मटेरिअल्समधील कूलर्सची व्यापक श्रेणी प्रदान करत आहोत. आमच्या श्रेणीमध्ये 60 हून अधिक मॉडेल्ससह आयओटी-सक्षम व वॉईस-कंट्रोल्ड एअर कूलर्स, मेटल-बॉडी कूलर्स व ऊर्जा बचत करणारे इन्व्हर्टर एअर कूलर्स यांचा समावेश आहे.

# महाविकास आघाडी जोमात महायुती कोमात : हेमंत पाटील

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

संपूर्ण देशासह महाराष्ट्रातही सध्या लोकसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे. निवडणुकीपूर्वी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे प्रादेशिक पक्ष फोडण्यात भाजपला यश आले. मात्र तरी देखील सत्तेसाठी नेत्यांचे होत असलेले पक्षांतर आणि पक्षफुटीच्या पार्श्वभूमीवर जनतेचा भाजपवर भरवसा राहिलेला नाही. अन् म्हणूनच येणारी निवडणूक ही भाजपला जिंकणे अवघड जाणार असून यावेळी जनता महायुती ऐवजी महाविकास आघाडीच्या बाजूने आपला कौल देईल, असा दावा इंडिया अगेंस्ट करप्शनचे राष्ट्रीय अध्यक्ष हेमंत पाटील यांनी केला आहे. हेमंत पाटील म्हणाले, प्रादेशिक पक्ष फोडल्या शिवाय आपल्याला अपेक्षित यश मिळणार नाही हे भारतीय जनता पक्ष जाणून होता. अन् म्हणूनच त्यांनी राज्यातील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे मोठे प्रादेशिक पक्ष फोडले. बापापासून मुलाला तोडलं. त्यामुळे सहाजिकच जनतेमध्ये बापाविषयी सहानुभूती निर्माण झाली आहे. अन् या लोकसभा निवडणुकीत जनता बापालाच म्हणजे महाविकास आघाडीलाच मतदान करणार असून या भावनेच्या लाटेत महाविकास आघाडी 22 ते 23 जागेवर निवडून येईल. भाजपला 12 किंवा 13 जागा मिळतील तर राष्ट्रवादी अजित पवार गटाला 2 तसेच शिंदे गटाची 1 जागा निवडून येण्याची शक्यता आहे.

# श्रीराम फायनान्स लिमिटेडने एफडी व्याज दर सुधारित केले

- 9 एप्रिल 2024 पासून प्रतिवर्ष 9.40%* पर्यंत परतावा प्रभावी
- ज्येष्ठ नागरिकांना प्रतिवर्ष 0.50%* अतिरिक्त व्याज
- महिला ठेवीदारांना प्रतिवर्ष 0.10%* अतिरिक्त व्याज

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

श्रीराम फायनान्स लिमिटेड (SFL) ही भारतातील सर्वात मोठी किरकोळ बिगर-बँकिंग वित्तीय कंपनी (एनबीएफसी/नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनी) आहे. त्यांनी मुदत ठेवींवरील व्याजदरात विविध मुदतपूर्वी कालावधीसाठी 0.05 ते 0.20 पर्यंत वाढ केली आहे. हे सुधारित दर 9 एप्रिल 2024 पासून लागू झाले आहेत.

ठेवीच्या किंवा नूतनीकरणाच्या वेळी 60 वर्ष किंवा त्याहून अधिक वयाचे ज्येष्ठ नागरिक प्रतिवर्ष अतिरिक्त 0.50% व्याज मिळवण्यास पात्र आहेत. तसेच महिला गुंतवणूकदारांना वार्षिक 0.10% अतिरिक्त व्याज मिळू शकते. श्रीराम फायनान्स लिमिटेड सर्व नूतनीकरणांवर वार्षिक 0.25% अतिरिक्त व्याज देईल. आयसीआरए (ICRA) ज्याला पूर्वी गुंतवणूक माहिती आणि क्रेडिट रेटिंग एजन्सी ऑफ इंडिया (Investment Information and Credit Rating Agency of India/ICRA) म्हटले जायचे, त्यांनी मुदत ठेवींना "[ICRA]AA+ (स्थिर)" असे रेट केले आहे. तर इंडिया रेटिंग आणि रिसर्चद्वारे मुदत ठेवींना "IND AA+/स्थिर" असे रेट केले गेले आहे. ठेवींची किमान रक्कम 5,000 रुपये असेल. ठेवी 1,000 रुपयांच्या पटीने स्वीकारल्या जातील. परिपक्वता (म्यॅच्युरिटी) मूल्यासाठी संचयी ठेवींचे नूतनीकरण केले जाऊ शकते.

गैर-संचयी मुदत ठेवींसाठी श्रीराम फायनान्स लिमिटेड 12 ते 60 महिन्यांच्या कालावधीसाठी 7.85% ते 8.80% प्रतिवर्ष व्याज दर ऑफर करते. संचयी मुदत ठेवींवरील प्रभावी उत्पन्न समान कालावधीसाठी 7.85% ते 10.50% प्रतिवर्ष आहे.

श्री. उमेश रेवणकर हे श्रीराम फायनान्स लिमिटेडचे उपाध्यक्ष आहेत. ते म्हणाले, “सुधारित मुदत ठेवी दर देण्यामागचा आमचा उद्देश आमच्या ठेवीदारांना आकर्षक ठेव दरांची श्रेणी प्रदान करण्याचा आहे. या सुधारणांमुळे ठेवीदारांना संपत्ती निर्मितीसाठी बराच फायदा होतो. इतकेच नव्हे तर त्यामुळे ठेवींच्या एकूण खर्चात संतुलन आणण्याच्या आणि त्याला अनुकूल बनवण्याच्या उद्देशालाही हातभार लागतो.”

# फोनपेची फेवा न्यू इयर फेस्टिव्हलसाठी हॉटेल असोसिएशन ऑफ नेपाळ पोखरासोबत भागीदारी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



फोनपे ने फेवा न्यू इयर फेस्टिव्हलचा भाग म्हणून 11 ते 14 एप्रिल दरम्यान, फोनपे नेटवर्कवर युपीआय लोकप्रिय करण्यासाठी ईसेवा आणि हॉटेल असोसिएशन ऑफ नेपाळ पोखरासोबत भागीदारी केल्याची आज घोषणा केली. न्यू इयर फेस्टिव्हल केवळ नेपाळमधील नागरिकांमध्येच लोकप्रिय नाही, तर या देशाला भेट देणाऱ्या आणि फेस्टिव्हलचा आनंद लुटणाऱ्या भारतीय पर्यटकांनाही याचे अप्रूप आहे. पारंपरिक नेपाळी खाद्यपदार्थ तसेच आंतरराष्ट्रीय खाद्यपदार्थांचे स्टॉल, स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय कलाकारांचे लाइव्ह संगीत सादरीकरण, पारंपरिक नेपाळी नृत्य आणि संगीत आणि कला प्रदर्शने व कार्यशाळा, याबरोबरच सांस्कृतिक कार्यक्रम, आयकॉनिक कार्यक्रम, नेपाळी संस्कृती आणि स्थानिक पाककृती यांचा सर्वोत्तम अनुभव घेण्याची युनिक संधी येथे मिळते.

या वर्षी फेस्टिव्हलमध्ये युपीआयद्वारे डिजिटल पेमेंट लोकप्रिय करण्याच्या उद्दिष्टाने फोनपे फेवा न्यू इयर फेस्टिव्हलदरम्यान अनेक ॲक्टिव्हिटींमध्ये आघाडीवर असेल. यामध्ये फोनपे ग्राहकांना डिजिटल पेमेंटची सुविधा उपलब्ध करून देता येईल आणि व्यापाऱ्यांमध्ये डिजिटल पेमेंटबद्दल जागरूकता वाढेल अशा प्रकारचे प्रत्यक्ष उपक्रम राबवेल. काही प्रमुख प्रत्यक्ष उपक्रम राबवत आणि डिजिटल ब्रँडिंग करत, डिजीटल पेमेंट आणि इतर ॲक्टिव्हिटींचा वापर कसा करायचा हे दाखवणारे किसॉक आणि ईसेवा व एचएएन पोखरा यांच्यासोबत फोनपे अन्य संवाद साधता येतील असेल उपक्रम राबवून युपीआय पेमेंटचा वापर कसा सोपा आहे ते दाखवतील.

फोनपेच्या इंटरनॅशनल पेमेंट्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी रितेश पै म्हणाले, "फेवा न्यू इयर फेस्टिव्हलचा एक भाग म्हणून युपीआयला लोकप्रिय करण्यात मदत करण्यासाठी ईसेवा आणि हॉटेलियर्स असोसिएशन ऑफ नेपाळ यांच्यासोबत भागीदारी करण्यास आम्ही उत्सुक आहोत. नेपाळचे सुंदर संगीत, खाद्यपदार्थ आणि संस्कृती अनुभवण्यासाठी अनेक भारतीय पर्यटक दरवर्षी येथे आवर्जून भेट देतात. नेपाळमधल्या फोनपे नेटवर्कवर युपीआय अधिक चांगल्या प्रकारे वाढावे यासाठी व्यापाऱ्यांना शिकवणे आणि त्यांच्यात जागरूकता निर्माण करणे याकडे आमचे सर्व लक्ष आहे. ही भागीदारी नेपाळच्या डिजिटल लँडस्केपमध्ये क्रांती घडवून आणेल, फोनपे च्या ग्राहकांना कोणत्याही ठिकाणी असूनही त्यांच्या सोयीनुसार व्यवहार करता येतील याची आम्ही काळजी घेऊ.”

ईसेवाचे मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश खडका म्हणाले की "फेवा न्यू इयर फेस्टिव्हलसाठी फोनपे आणि हॉटेल असोसिएशन ऑफ नेपाळसोबत भागीदारी ही ईसेवा साठी नेपाळमध्ये डिजिटल पेमेंटला आणखी प्रोत्साहन देण्यासाठी एक रोमांचक संधी आहे. आम्ही देशातील अग्रेसर डिजिटल वॉलेट असून, डिजिटल पेमेंट इकोसिस्टम वाढवणे आणि व्यापारी व ग्राहकांना यासाठी सोपा उपाय देणे यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. नेपाळसाठी भारतीय पाहुणे अतिशय महत्त्वाचे आहेत.

## थोडक्यात



### चेटीचंड महोत्सवातून घडले सिंधी संस्कृतीचे दर्शन

**पुणे (आरंभ पर्व) :** 'आयो लाल झुलेलाल'च्या जयघोषात भगवान साई झुलेलाल यांची भक्तीभावाने केलेली आरती... झुलेलाल यांच्या मनमोहक प्रतिमेचे पूजन... सिंधी गीतांची बहारदार मैफल... कलात्मक नृत्याविष्कार... चाट-सामोसा-गोड भाताचा प्रसाद... रुचकर लंगर... डोक्यावर लाल टोपी आणि साई झुलेलाल यांचे अखंड भजन अशा भावभक्तीमय वातावरणात सिंधी संस्कृतीचे दर्शन घडले. या वार्षिक महोत्सवात सहभागी प्रत्येक सिंधी बंधू-भगिनींच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. सिंधी समाजाचे नवीन वर्ष व भगवान साई झुलेलाल यांच्या 1074 व्या जन्मोत्सवानिमित्त सिंधू सेवा दलातर्फे 'चेटीचंड' महोत्सव आयोजिला होता. येरवड्यातील डेक्कन कॉलेजच्या बँक्वेट हॉल व मैदानावर झालेल्या या महोत्सवात सहभागी प्रत्येक सिंधी बंधू-भगिनींच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. भगवान साई झुलेलाल यांच्या प्रतिमेचे पूजन करून सामाजिक आणि सांस्कृतिक महोत्सवाची सुरुवात झाली. संगीत, गायन, भजन आणि महाप्रसादातील विविध पदार्थ यामुळे चेटीचंड महोत्सव वैशिष्ट्यपूर्ण ठरला. मुंबईतील प्रसिद्ध गायक शुभम नाथानी, नागपूरची प्रतिभावान गायिका दृष्टी कुकरेजा, राजस्थानचे उत्कृष्ठ गायक मास्टर हर्षल यांचा लाईव्ह कॉन्सर्ट आणि जयपूर येथील विनोदवीर भाग्यश्री दर्यानीच्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. सिंधी समाजात कपिल शर्मा अशी ओळख असलेल्या मोहित शेवानीने कार्यक्रमाचे संचालन केले. जनरेशन नेक्स्ट डान्स अकॅडमीच्या मुलांनी मनमोहक नृत्याविष्कार सादर केले. प्रीतिभोजनाने (महाप्रसाद) महोत्सवाची सांगता झाली. पुणे, पिंपरी-चिंचवड व परिसरातील चार-साडेचार हजार सिंधी बांधव या महोत्सवात सहभागी झाले.




### लुब्रिझोल कॉर्पोरेशनचे पुण्यात नवीन ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर सुरु

**पुणे (आरंभ पर्व) :** विशेष रसायन (स्पेशॅलिटी केमिकल्स)मध्ये अग्रगण्य असलेल्या, लुब्रिझोलने आपले जागतिक क्षमता केंद्र (नवीन ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर: जीसीसी) पुण्यात सुरु केले. हिंजेवाडीमधील एम्बेसी टेक झोनमध्ये हे लुब्रिझोल ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर 42,000 चौरस फूट असून यामध्ये वेलनेस रुम, मनोरंजन क्षेत्र, प्रशिक्षण क्षेत्र आहे. इंजिनिअरिंग, सप्लाय चेन, टेक्नॉलॉजी, फायनान्स, प्रोक्युरमेन्ट, लीगल आणि ह्यूमन रिसोर्स या क्षेत्रात काम करणाऱ्या 200 हून अधिक प्रादेशिक कर्मचाऱ्यांना पुढील वर्षभरात जीसीसी मध्ये नोकऱ्या देणार असल्याची माहिती उद्घाटनप्रसंगी कंपनीकडून देण्यात आली. यावेळी लुब्रिझोलचे विस्तार विभागाचे वरिष्ठ उपाध्यक्ष जेटी जोन्स, भारत, मध्य पूर्व आणि आफ्रिकेच्या व्यवस्थापकीय संचालिका भावना बिंद्रा, भारताचे जीसीसी प्रमुख अभिषेक जैन उपस्थित होते.

# हुकूमशाही प्रवृत्ती संसदीय लोकशाहीला मारक

## डॉ. श्रीपाल सबनीस यांचे प्रतिपादन; पहिल्या विश्वबंधुता साहित्य संमेलनाचे उद्घाटन




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"अस्थिरतेच्या वातावरणात कोणत्याही समाजाची, प्रांताची वा देशाची प्रगती होत नाही. आज जगभरात अस्थितरतेचे वातावरण वाढत आहे. लोकशाही प्रक्रियेतून निवडणूक आलेले लोक हुकूमशाही प्रवृत्तीने वागत आहेत. रशियाचे पुतीन, चीनचे जिनपिंग व अमेरिकेचे बायडेन आधुनिक काळातील हिटलरप्रमाणे वागत आहेत. भारतातही या हुकूमशाही प्रवृत्तीचा शिरकाव होत आहे. ही प्रवृत्ती संसदीय लोकशाहीला मारक आहे," असे प्रतिपादन 89 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन व पहिल्या विश्वबंधुता संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

बंधुता लोकचळवळीच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषद, बंधुता प्रतिष्ठान, काषाय प्रकाशन, रयत शिक्षण संस्थेचे औंध येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, भोसरी येथील भगवान महावीर शिक्षण संस्थेचे प्रीतम प्रकाश महाविद्यालय आणि भारतीय जैन संघटनेचे वाघोली येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पहिल्या विश्वबंधुता साहित्य संमेलनाचे उद्घाटन डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

नवी पेठेतील एस. एम. जोशी सभागृहात झालेल्या संमेलनावेळी उद्घाटक रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष चंद्रकांत दळवी, बंधुताचार्य प्रकाश रोकडे, स्वागताध्यक्ष कृष्णकुमार गोयल, ज्येष्ठ समाजवादी विचारवंत प्रा. सुभाष वारे, डॉ. विजय ताम्हाणे, मधुश्री ओव्हाळ, प्रा. चंद्रकांत वानखेडे, डॉ. अशोककुमार पगारिया, डॉ. अरुण आंधळे आदी उपस्थित होते. मधुश्री ओव्हाळ लिखित 'सम्यक सत्यार्थी' पुस्तकाचे, नंदा कोकाटे लिखित 'पुकार बंधुतेची' काव्यगीताचे प्रकाशन यावेळी झाले. वासंती मेरु (पलूस), पूजा विश्वकर्मा (पुणे), भाग्यश्री बगाड (गुजरात), राम तरटे (नांदेड), चंद्रशेखर महाजन (अकोट), पल्लवी पतंगे (मुंबई), प्रकाश पाठक (संभाजीनगर), गजानन गायकवाड (सिल्लोड), युवराज पाटील (कोल्हापूर), सुरज दिघे (तळेगा), सीमा झुंजारराव (मुंबई) यांना 'बंधुता शब्दक्रांती साहित्य पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

दुपारच्या सत्रात प्रा. चंद्रकांत वानखेडे यांच्या अध्यक्षतेखाली 'अभिजात मराठी काव्यपंढरी' कविसंमेलन झाले. यामध्ये संगीता झिंजुरके, डॉ. बंडोपंत कांबळे, प्रा. संतोष काळे यांच्यासह राज्यभरातून निमंत्रित कवी सहभागी झाले होते. उमरखेड येथील सचिन शिंदे यांना प्रकाशयात्री साहित्य पुरस्कार, संभाजीनगर येथील विजयकुमार पांचाळ यांना प्रकाशपर्व साहित्य पुरस्कार, तर मुखेड येथील तुकाराम कांबळे यांना प्रकाशगाथा साहित्यगाथा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच बंधुता काव्यप्रतिभा पुरस्काराने विविध कवींचा सन्मान करण्यात आला.

डॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले, "समाजातील प्रत्येक माणूस हा बंधुतेने जोडलेला आहे. स्वातंत्र्य, समतेसाठी कायदा करता येतो, मात्र बंधुतेचा कायदा करता येत नाही. ती प्रत्येकाच्या मनातून रुजायला हवी. जातीय, धार्मिक वाद बंधुतेमुळे संपतील. भारतीय संस्कृतीचा आत्मा म्हणजे बंधुता व करूणा आहे. धर्म ही संकल्पना मर्यादित असून, आपल्यातील माणूसपण महत्वाचे आहे. सर्व धर्मग्रंथ, महापुरुष बंधुतेची शिकवण देतात. त्यामुळे या महापुरुषांच्या चांगल्या गोष्टींची बेरीज करत त्यातून समाजाचा, देशाचा विकास साधायला हवा."

प्रा. सुभाष वारे म्हणाले, "स्वातंत्र्य व समता प्रत्यक्षात येण्यासाठी कायदे करता येतात. मात्र, बंधुतेचा कोणताही कायदा नसून, ती भावना अंतर्मनातून यावी लागते. आज संविधानावर आघात होत असताना बंधुतेचा विचारच प्रत्येक नागरिकाला प्रतिष्ठा, राष्ट्राला एकात्मिक भावनेने जोडून ठेवू शकते. बंधुतेची ही मशाल लोकशाहीला मारक असलेल्या हुकूमशाहीला पराभूत केल्याशिवाय राहत नाही. त्यामुळे बंधुतेचा विचार जनमनात पोहोचवण्यासाठी प्रत्येकाने काम करायला हवे."

चंद्रकांत दळवी म्हणाले, "बंधुतेचा विचार घेऊन समाजात खोलवर त्याची जागृती करण्याचे काम रोकडे यांनी केले आहे. सामान्यातले हिरे शोधून त्यांना घडविण्याचे आणि बंधुतेच्या व्यासपीठावर आणण्याचे काम आजच्या काळात कठीण आहे. अशावेळी बंधुतेचा हा दीप तेवत ठेवून समाजाला प्रकाशमय करण्याचे काम कौतुकास्पद आहे."

बंधुताचार्य प्रकाश रोकडे, मधुश्री ओव्हाळ, नंदा कोकाटे यांनी आपले विचार मांडले. कृष्णकुमार गोयल यांनी स्वागतपर भाषण केले. शंकर आथरे यांनी प्रास्ताविक केले.

प्रा. संगीता झिंजुरके यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. विजय ताम्हाणे यांनी आभार मानले. प्रा. प्रशांत रोकडे, डॉ. प्रभंजन चव्हाण, प्रा. सदाशिव कांबळे आणि डॉ. सहदेव चव्हाण यांनी संमेलनाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

## रसिकांच्या हृदयाचा ठाव घेणार - अत्तर



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

द डार्क शॅडो मोशन पिक्चर्स प्रस्तुत आणि रुहानी म्युझिक निर्मित असलेल्या 'अत्तर'चे नुकतेच पोस्टर सोशल मीडियावर झळकले आहे. दिग्दर्शक रामकुमार गोरखनाथ शेडगे यांनी लेखन आणि दिग्दर्शन केलेली ही कलाकृती असून माणसाच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत 'अत्तर' खूप महत्वाची भूमिका बजावत असते. 'अत्तर' जणू माणसाच्या जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. ' म्हटलं की सुंगदाची दरवळ हेच 'अत्तर' अनेकांचे आयुष्य सुगंधी करते ते तर काही जणांच्या वाट्याला अडसर बनते. याच सुगंधी 'अत्तराची अस्वस्थ करणारी गोष्ट दिग्दर्शक रामकुमार शेडगे यांनी मांडली आहे. गटारात काम करणाऱ्या वडिलांना एक अत्तराची बाटली मुलीला वडिलांना द्यायची आहे. गटारात काम करणाऱ्या वडिलांच्या आयुष्यात सुगंधाची दरवळ आणण्यासाठी त्या मुलीच्या संघर्षाची कहाणी 'अत्तर' या लघुपटात मांडण्यात आली आहे. यामध्ये बालकलाकाराच्या प्रमुख भूमिकेत मीरा शेडगे आपल्याला पाहावयास मिळणार आहे. या अगोदर आपल्याला मीरा ही अभिनेत्री निवेदिता सराफ आणि डॉ. गिरीश ओक यांच्यासोबत जाहिरातीमध्ये काम करताना दिसली होती. त्याचबरोबर अभिनेत्री रेवा बर्गे, पुरुषोत्तम बाबर, विनय सोनवणे, रमेश साठे असे कलाकार आहेत.

# उद्योजक एल बी कुंजीर यांची नाराजी दूर

## उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दिली वळती गावाला भेट

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

हवेली तालुक्यातील वळती गावचे नामवंत व आदर्श ज्येष्ठ उद्योजक सरपंच एल बी कुंजीर यांनी वळती गावामध्ये स्वखर्चाने अनेक विकास कामे केली आहेत दोन महिन्यापूर्वी त्यांनी नुकत्याच स्वखर्चातून उभारलेल्या जिल्हा परिषदेतील विद्यार्थ्यांसाठी तीन मजली इमारतीचे उद्घाटनाचे निमंत्रण उपमुख्यमंत्री अजित पवार यांना दिले होते. वेळ, तारीख फिक्स झाली होती मात्र अजित पवारांचा दौरा अचानक रद्द झाल्याने उद्योजक एल बी कुंजीर व पंचक्रोशीतील नागरिक नाराज झाले होते. याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एलबी कुंजीर यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र अजित पवार यांनी गावात आलेच पाहिजे हा आग्रह एल बी कुंजीर आणि पंचक्रोशीतील नागरिकांचा होता ही नाराजी दूर करण्यासाठी अजित पवारांनी थेट वळती गावाला भेट देऊन चार तास वेळ काढून नागरिकांशी संवाद साधून जेवणाचा आस्वाद घेऊन नाराजी दूर केली. यावेळी अजित पवार यांनी उद्योजक एल बी कुंजीर यांनी स्वखर्चाने गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी उभारलेल्या तीन मजली भव्य दिव्य सुसज्ज इमारतीची प्रत्येक मजल्यावर जाऊन सर्व वर्ग खोल्यांची बारकाईने पाहणी केली. शाळेच्या वर्गातील बोलक्या भिंती पाहून अजित पवारांनी कौतुक केले तसेच काही सूचनाही केल्या त्याचबरोबर इमारतीच्या टेरेसवर जाऊन अजित पवार आणि डोंगरकड्याची माहिती घेतली तसेच नवीन रेल्वे लाईन ब्रिटिशकालीन रेल्वे लाईनची ही माहिती घेतली यानंतर अजित पवार यांनी एलबी कुंजीर यांच्या निवासस्थानी भेट दिली. यावेळी एल बी कुंजीर यांच्या पत्नी माजी सरपंच कुसुमताई कुंजीर तसेच त्यांच्या कुटुंबातील महिलांनी अजित पवारांचे औक्षण करून स्वागत केले. यावेळी कुंजीर परिवाराच्या वतीने अजित पवारांचा पगडी, शाल, श्रीफळ, विठ्ठलाची मूर्ती व वीणा देऊन सत्कार केला. यावेळी वळती येथील नागरिकांनी तुकाई भैरवनाथ मंदिराच्या मंदिराला पर्यटन स्थळाचा दर्जा मिळावा, शेती, घरगुती तसेच व्यवसायासाठी अतिशय कमी दाबाने वीज पुरवठा होतो यासाठी पुरंदर उपसा योजनेच्या ताब्यात असलेल्या शिंदवणे येथील हद्दीतील एक एकर जागेमध्ये सब स्टेशन उभारण्याची मागणी केली. खडकवासला धरणातून जे पाणी सोडण्यात येते त्या पाण्याचा प्रवाह कमी दाबाने सोडावा यामुळे कॅनॉलच्या आजूबाजूला असणाऱ्या गावोगावच्या पाणीपुरवठ्याच्या विहिरींनाही पाणी टिकून राहील. पुरंदर उपसा योजनेच्या पंप क्रमांक पाच मधून वळती गावातील शेततळ्यांना पाणी मिळावे तसेच वन्य प्राण्यांची ही पाण्याची सोय करावी अशी मागणी केली. या सर्व मागण्यांची अजित पवार यांनी दखल घेऊन आचारसंहिता संपल्यानंतर या कामाला प्राधान्य देण्याचा प्रयत्न करू असे आश्वासन दिले. यावेळी गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर भास्कर माने, गणेश माने, अमित कुंजीर,तुकाराम महाराजांचे वंशज चंद्रकांत मोरे यांच्यासह वळती, तरडे, उरळी कांचन, शिंदवणे परिसरातील नागरिक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी यशवंत सहकारी साखर कारखान्याचे नवनिर्वाचित चेअरमन, उपाध्यक्ष, संचालक मंडळ उपस्थित होते.

# देशासाठी सेवा करण्याची संधी हेच मोठे भाग्य : अमित भोसले

## सेवानिवृत्तीबद्दल गौरव सन्मान





**सोलापूर (दै. आरंभ पर्व)**

देशाची सेवा करण्याचं संधी मिळणं हा अविस्मरणीय क्षण आहे . तो कधीही विसरु शकणार नाही असे गौरवोद्गार नुकतेच इंडियन आर्मी निवृत्त ऑफिसर श्री. अमित भोसले यांनी व्यक्त केले .

सारोळे ता.बार्शी येथे त्यांचा गौरव करण्यात आला त्यावेळी त्यानी मनोगत व्यक्त केले . देशसेवेबद्दल आवड निर्माण व्हायला हवीच काहीही होऊ द्या प्रयत्न करणे कधी सोडुन देऊ नका एक दिवस यश नक्की मिळते.असेहीं ते म्हणाले .

सतरा वर्ष इंडियन आर्मीमध्ये सेवा करून निवृत्त झाल्याबद्दल गावकऱ्यांच्या वतीने आज त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी ग्रामस्थ व परिवाराच्या वतीने त्यांची गावातून भव्य अशी रॅली काढण्यात आली. अतिशय उत्साही वातावरणात ह्यां सुपुत्राचे स्वागत करण्यात आले. 17 वर्षाची देशसेवा केलेल्या सुपुत्राचे अत्यंत भावूक वातावरणामध्ये त्यांचे स्वागत करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने सुपुत्राचा सन्मान करण्याची संधी गावकऱ्यांना मिळाली.सर्वजण एकत्र येतं हा कार्यक्रम साजरा झाला.

ह्यां कार्यक्रमास जेष्ठ नेते अरुणभाऊ कापसे माजी सभापती लक्ष्मणबापू संकपाळ माजी पंचायत समिती सदस्य विलासदादा गाटे शेळगावंचे नेते बाबासाहेब गायकवाड हभप विवेकानंद बोधले महाराज मा.उपसरपंच जितूभाऊ चौधरी कवी प्रशांत देशमुख विश्वनाथ साबळे सर धनंजय जाधव सागर अंबुरे सुधाकर जाधव आदीसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सरपंच बाळराजे गाटे बालाजीभाऊ निचळ, प्रकाश गाटे , किरण गाटे, अविनाश शिंदे ,श्रीकृष्ण पाटील जितेंद्र भोसले , रोहन भोसले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सु.ता ढेकणे सर व आभार प्रदर्शन डेव्हलपमेंट ऑफिसर सचिन भोसले सर यांनी केले.

# सोनालिका ट्रॅक्टर्सने आर्थिक वर्ष २०२४ मध्ये १५.३ टक्के इतका एकूण वार्षिक बाजार हिस्सा नोंदवला

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारताचा क्रमांक एकचा ट्रॅक्टर निर्यात ब्रँड असलेल्या सोनालिका ट्रॅक्टर्सने एक नवीन दिमाखदार कामगिरी करून आर्थिक वर्ष 2024 चा सर्वांगीण भरधाव प्रवास पूर्ण केला आहे. नाविन्यपूर्णता आणि शेतकरीकेंद्रीत दृष्टिकोन यांच्या प्रति कटिबद्धता पुढे नेत कंपनीने ही कामगिरी केली आहे. कंपनीला आर्थिक वर्ष 2024 मध्ये 15.3 टक्के (अंदाजे) या सर्वकालीन सर्वोच्च वार्षिक एकंदर बाजारपेठ हिश्श्याची नोंद करताना आनंद होत आहे. तसेच देशांतर्गत बाजारपेठेत आर्थिक वर्ष 2024 मध्ये वाढ नोंदविणारा तो एकमेव ब्रँड ठरला आहे. या चमकदार कामगिरीमुळे सोनालिकाला उद्योगाची कामगिरी मागे टाकणेसुद्धा शक्य झाले आहे.

सोनालिकाच्या या नवीन विक्रमामध्ये आर्थिक वर्ष 2024 मधील 34.4 टक्के (अंदाजे) एवढ्या निर्यात बाजारपेठ हिश्श्याचासुद्धा समावेश आहे. भारतातील ट्रॅक्टर निर्यात कंपन्यांमध्ये सोनालिकाने ही कामगिरी नोंदविली आहे. यात बाजारपेठेतील हिश्श्यामधील भरीव अशा 6.2 टक्के अंश (अंदाजे) बदलाचाही समावेश आहे. यामुळे भारताचा क्रमांक एकचा ट्रॅक्टर निर्यातक म्हणून कंपनीचे स्थान भक्कम झाले असून त्याच्या पुढील ब्रँडपेक्षा ती लक्षणीय प्रमाणात पुढे आहे. या संपूर्ण वर्षभरात सोनालिका आर्थिक वर्ष 2024 च्या परिस्थितीच्या गरजांमधून मार्ग काढत राहिली आणि चाकोरीबाहेरचा आपला दृष्टिकोन जोपासत राहिली. होशियारपूर येथे 1300 कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून दोन नवीन प्रकल्पांचे अनावरण करून ज्यामुळे जगातील सर्वात मोठ्या ट्रॅक्टर प्रकल्पाची मालकी असल्याची सोनालिकाची स्थिती आणखी दृढ होईल. भारतात 'आयटीएल ग्लोबल पार्टनर्स समिट(जीपीएस 200)' या अशा प्रकारच्या पहिल्याच कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय बाजारपेठांसाठी तयार केलेल्या 5 नवीन ट्रॅक्टरचे अनावरण करून, ज्यामध्ये एसव्ही मालिकेच्या इलेक्ट्रिक ट्रॅक्टरचा समावेश आहे. प्रीमियम टायगर मालिकेत 40-75 एचपी श्रेणीत सर्वात मोठ्या 10 नवीन मॉडेलचे अनावरण करून. आपल्या श्रेणीतील सर्वात मोठे इंजिन असलेले सिकंदर डीएलएक्स डीआय 60 टॉर्क प्लस सादर करून आणि उद्योगातील प्रथमच देशभरात एकच किंमत लागू करून.

आपल्या सर्व ट्रॅक्टर श्रेणींमध्ये 5 वर्षांची ट्रॅक्टर वॉरंटी सादर करून सर्वसमावेशक कृषी उपाय उपलब्ध करून संपूर्णपणे यांत्रिक कृषी इकोसिस्टम प्रस्थापित करण्याच्या दिशेने सोनालिकाची वाटचाल सुरु होत आहे. अशा वेळेस संपूर्ण आर्थिक वर्ष 2024 मधील सोनालिकाच्या प्रवासातून हेवी-ड्यूटी ट्रॅक्टर आणि प्रगत अवजारे यांच्या सहाय्याने तळागाळातील शेतकऱ्यांशी कंपनीचा समन्वय दिसून येतो.

इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स लिमिटेडचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक श्री. रमण मित्तल म्हणाले, "आमच्या प्रीमियम टायगर रेंज आणि फ्लॅगशिप सिकंदर डीएलएक्स सीरीजमध्ये नवीन आणि प्रगत उत्पादने लाँच करण्यावर आमचा सातत्यपूर्ण फोकस आहे. त्यासोबतच आमच्या संपूर्ण हेवी ड्यूटी ट्रॅक्टर श्रेणीच्या तंत्रज्ञानामध्ये सातत्याने सुधारणा केल्यामुळे ही आश्चर्यकारक वाढ झाली आहे. याशिवाय, आमच्या वेबसाईटवर ट्रॅक्टरच्या किमती दाखविण्याच्या आमच्या अनोख्या पावलामुळे ट्रॅक्टर खरेदीमध्ये पारदर्शकता निर्माण झाली आहे. त्यातून भागधारकांचा आमच्या ब्रँडवरील विश्वास सतत वाढत गेला आहे. या विशिष्ट दृष्टीकोनामुळे आमचा सतत वाढीचा मार्गही मोकळा होत आहे. शिवाय, भारतातून ट्रॅक्टर निर्यातीत आमच्या अग्रस्थानामुळे आम्ही जगभरात सतत आणि आक्रमकपणे नवनवीन शोध घेण्यासाठी प्रवृत्त होत आहोत. यातील बहुतांश तंत्रज्ञानाच्या नवकल्पना 'मेड इन इंडिया' असल्याने, त्या आम्हाला चांगल्या भविष्यासाठी तयार होण्यात मदत करत आहेत. आमचे शिर उंच करून आणि अशा उल्लेखनीय कामगिरीच्या मागोमाग आम्ही एक संस्था आणि नेटवर्क म्हणून आणखी मजबूत झालो आहोत. त्यातून आर्थिक वर्ष 2025 मध्ये नवीन टप्पे गाठण्यासाठी आणि आमच्या 'मिशन 2 लाख'कडे वेगाने वाटचाल करण्यासाठी आम्ही सज्ज आहोत."



दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा

WE ARE HIRING !
Open Position
VIDEO EDITOR
आपला बायोडाटा खालील ईमेलवर पाठवावा.
for Video Editor असा स्पष्ट उल्लेख करावा.
aparvinfo@gmail.com & ganganepratik4@gmail.com



राहण्याची सोय उपलब्ध



## प्राजक्ताचा ग्लॅमरस अंदाज! फोटोवर नेटकऱ्यांकडून कमेंट्सचा पाऊस





**आरंभ पर्व**

प्राजक्ता माळीचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. अभिनेत्री सोशल मीडियावर कायम सक्रिय असते. प्राजक्ताने शेअर केलेल्या फोटोंवर नेटकरी नेहमीच लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव करत असतात. सध्या अभिनेत्रीने शेअर केलेल्या अशाच एका फोटोने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. यामध्ये प्राजक्ताने ऑफ शोल्डर लेदर ड्रेस परिधान केल्याचं पाहायला मिळत आहे. “हाय गरमी...” हे गाणं जोडत प्राजक्ताने तिच्या फोटोंना “मी बाहेरच्या वातावरणाविषयी बोलतेय...” असं हटके कॅप्शन दिलं आहे. प्राजक्ता या वेस्टर्न लूकमध्ये अतिशय सुंदर दिसत आहे.

# भरजरी नऊवारीत अपूर्वा लाली लाल







**आरंभ पर्व**

स्टार प्रवाह वाहिनीवरील ‘प्रेमाची गोष्ट’ या मालिकेला प्रेक्षकांचे भरभरुन प्रेम मिळत आहे. या मालिकेत अभिनेत्री अपूर्वा नेमळेकर ‘सावनी’ची भूमिका साकारत आहे. अपूर्वाने नुकतेच भरजरी नऊवारी साडीत फोटोशूट केले आहे.या फोटोशूटसाठी अपूर्वाने गुलाबी आणि जांभळ्या रंगाची भरजरी नऊवारी नेसली आहे.

नऊवारी साडीतील लूकवर अपूर्वाने भरपूर दागिन्यांचा साज केला आहे. अपूर्वाच्या नऊवारी साडीतील लूकसाठी मनीषा कोळगे यांनी मेकअप केला आहे. या फोटोशूटला अपूर्वाने ‘गुलाबी साडी...’ हे गाणं कॅप्शनमध्ये लिहिले आहे.

## ‘कारण गुन्ह्याला माफी नाही’ मालिकेतील अभिनेत्रीचं दाक्षिणात्य लूकमधील फोटोशूट चर्चेत



**आरंभ पर्व**

सोनी मराठी वाहिनीवरील ‘कारण गुन्ह्याला माफी नाही’ मालिका प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस पडत आहे. नेहमी निरनिराळ्या भूमिकांमधून प्रेक्षकांचे मनोरंजन करणारी अभिनेत्री अश्विनी कासार आता एका वेगळ्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. अश्विनीने अनेक गाजलेल्या मालिका आणि चित्रपटांमध्ये काम केले आहे. अश्विनीने नुकतेच दाक्षिणात्य लूकमध्ये सुंदर फोटोशूट केले आहे. या फोटोशूटसाठी अश्विनीने पांढऱ्या रंगाची सोनेरी बॉर्डर असलेली साडी नेसली आहे. पांढऱ्या साडीवर अश्विनीने भगव्या रंगाचा हटके ब्लाऊज परिधान केला आहे. दाक्षिणात्य साडीतील लूकवर अश्विनीने मोजके दागिने परिधान केले आहेत. अश्विनीचं दाक्षिणात्य लूकमधील फोटोशूट इन्स्टाग्रामवर चर्चेत आहे.



## लाडकी जोडी समृद्धी केळकर हर्षद अतकरी येणार भेटीला



**आरंभ पर्व**

स्टार प्रवाह वाहिनीवरील ‘फुलाला सुगंध माती’चा मालिकेतून प्रेक्षकांच्या घराघरात पोहोचलेली लाडकी जोडी अर्थात शुभम आणि कीर्ती म्हणजेच अभिनेत्री समृद्धी केळकर आणि हर्षद अतकरी पुन्हा एकदा एकत्र दिसणार आहेत. ‘मी होणार सुपरस्टार जोडी नंबर वन’च्या गुढीपाडवा विशेष भागात समृद्धीला सूत्रसंचालनात साथ देणार आहे अभिनेता हर्षद अतकरी. यंदाच्या पर्वाचं वेगळेपण म्हणजे स्पर्धक जोडीने नृत्य सादर करतात. आई-मुलगी, गुरु-शिष्य, मामा-भाचे, बहिणी-बहिणी अशी अनेक नाती आणि त्यांची नृत्यकला या मंचावर पहायला मिळत आहे. स्पर्धकांबरोबरच सूत्रसंचालनही जोडीने सादर होत आहे.

समृद्धीबरोबरच स्टार प्रवाह परिवारातले कलाकार सूत्रसंचालकाची भूमिका पार पाडतात. ‘मन धागा धागा’ मालिकेतील सार्थक आणि ‘साधी माणसं’ मालिकेतील सत्यानंतर आता अभिनेता हर्षद अतकरी सूत्रसंचानलाची भूमिका पार पाडताना दिसेल. समृद्धी आणि हर्षदच्या जोडीला प्रेक्षकांचं भरभरुन प्रेम मिळालं आहे. त्यामुळे ही लोकप्रिय जोडी पुन्हा एकदा पहाण्याची संधी ‘मी होणार सुपरस्टार जोडी नंबर वन’चा मंच घेऊन आला आहे.




## प्रथमेश परब म्हणतोय 'होय महाराजा'...



**आरंभ पर्व**

मराठी चित्रपट आज जगभरातील प्रेक्षकांवर मोहिनी घालण्याचं काम करत आहेत. देश-विदेशांतील चित्रपट महोत्सवांसोबतच पुरस्कार सोहळ्यांमध्येही मराठी चित्रपटांची सरशी होत असून, आशयघन मराठी सिनेमे तिकिटबारीवरही गर्दी खेचत आहेत. अशाच प्रकारची काहीशी कामगिरी करणारा तसेच एका पेक्षा एक अफलातून विनोदवीरांची मांदियाळी असलेल्या चित्रपटाची गुढी पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर घोषणा करण्यात आली आहे. 'होय महाराजा' असं शीर्षक असलेला हा चित्रपट रसिकांचे संपूर्ण पैसे वसूल मनोरंजन करणार आहे. या चित्रपटाच्या रूपात एक कौटुंबिक मनोरंजन करणारा धम्माल विनोदी चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

एलएमएस फिल्म्स प्रा. लि. या बॅनरखाली दिग्दर्शक शैलेश एल. एस. शेट्टी यांनी 'होय महाराजा' चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. महाराष्ट्राचा लाडका अभिनेता प्रथमेश परब 'होय महाराजा' म्हणत मुख्य भूमिकेत झळकणार आहे. करियरच्या सुरुवातीपासून प्रथमेशनं साकारलेल्या विविधांगी व्यक्तिरेखांनी प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यात यश मिळवलं आहे. त्यामुळे या चित्रपटात प्रथमेश कोणत्या भूमिकेत दिसणार याबाबत कुतूहल आहे. क्राईम-कॉमेडी प्रकारात मोडणारा हा चित्रपट एका अनोख्या संकल्पनेवर आधारलेला आहे. एक सर्वसामान्य तरुण आपल्या प्रेमाखातर कशा प्रकारे लढा देतो याची रोमांचक कहाणी 'होय महाराजा'मध्ये पाहायला मिळणार आहे. या चित्रपटात प्रथमेशसोबत अंकिता ए. लांडे ही अभिनेत्री दिसणार आहे. याखेरीज अभिजीत चव्हाण, संदीप पाठक, वैभव मांगले, समीर चौगुले असे एका पेक्षा एक अफलातून विनोदवीर या चित्रपटात वेगवेगळ्या भूमिकांमध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

'होय महाराजा' चित्रपटाची कथा, पटकथा आणि संवादलेखन संचित बेद्रे यांनी केलं आहे. गुरु ठाकूरने लिहिलेल्या गीतांना चिनार-महेश या संगीतकार जोडीचं संगीत लाभलं आहे. डिओपी वासुदेव राणे यांनी सिनेमॅटोग्राफी केली असून, संकलन निलेश नवनाथ गावंड यांनी केलं आहे. पार्श्वसंगीत अमेया नरे, साजन पटेल यांनी दिलं असून, नृत्यदिग्दर्शन फुलवा खामकरने केलं आहे. फाईट मास्टर मोझेस फेर्नांडीस यांची ॲक्शन चित्रपटात पाहायला मिळणार असून, कला दिग्दर्शन संतोष फुटाणे यांनी केलं आहे. जान्हवी सावंत सुर्वे यांनी वेशभूषा केली आहे.

## आपल्या लाडक्या पाळीव प्राण्यांकडून ‘पॉझिटिव्ह लाइफ लेसन्स’

**आरंभ पर्व**

आपल्या कुटुंबामधील पाळीव प्राणी आपला दिवस प्रेम, आनंद व साहचर्यासह उत्साहपूर्ण करतात. त्यांची निष्ठा व आपुलकी आपल्याला अतूट प्रेमाची जाणीव करून देते. नॅशनल पेट डे साजरा करण्यानिमित्त एण्ड टीव्हीवरील कलाकार त्यांचे पाळीव प्राणी आणि त्यांच्या प्रेमाबाबत व निष्ठेबाबत सांगत आहेत. हे कलाकार आहेत राहुल जेठवा (मालिका ‘अटल’मधील अवध बिहारी वाजपेयी), गीतांजली मिश्रा (मालिका ‘हप्पू की उलटन पलटन’मधील राजेश सिंग) आणि विदिशा श्रीवास्तव (मालिका ‘भाबीजी घर पर है’मधील अनिता भाबी). मालिका ‘अटल’मधील राहुल जेठवा ऊर्फ अवध बिहारी वाजपेयी म्हणाले,पाळीव प्राणी आपल्या जीवनात आनंद आणतात. आपण कामावरून घरी आल्यानंतर ते दरवाज्यावर आपले स्वागत करतात, अवघड काळादरम्यान त्यांची उपस्थिती उत्साह निर्माण करते. आपले केसाळ सोबती अतूट प्रेम व आनंदासह आपला दिवस उत्साहपूर्ण करतात. माझा कुत्रा सत्विक याचे नाव आध्यात्मिकतेवरून ठेवण्यात आले आहे, ज्यामधून माझा आध्यात्मिकतेचा प्रवास दिसून येतो. माझ्या बहिणीच्या विवाहानंतर मी एकटा झालो असताना तो माझ्या जीवनात आला आणि त्याचे प्रेम व आपुलकीने बहिणीची कमी काहीशी भरुन काढली. आमच्याकडे फिश टँक देखील आहे, आम्ही त्या टँकमधील माशांना पोहताना पाहत वेळ व्यतित करतो आणि आमचा तणाव दूर होतो. या दोघांकडून बरेच काही शिकण्यासारखे आहे. कुत्रा आपल्याला निष्ठा, साध्या क्षणांमध्ये आनंदी राहण्यास व अतूट प्रेम व्यक्त करण्यास शिकवतो, तर मासे आपल्याला परिस्थितीशी जुळवून घेण्याची, सुसंगता राखण्याची शिकवण देतात, ज्यामुळे स्थिरता, सामुदायिक भावना असे उत्तम गुण विकसित होण्यास मदत होऊ शकते.”

मालिका हप्पू की उलटन पलटन’मधील गीतांजली मिश्रा ऊर्फ राजेश म्हणाल्या, दिवसामधील माझा सर्वात आनंदमय किंवा आवडता क्षण म्हणजे माझा कुत्रा‘बम बम’सोबत खेळणे आणि त्याला मिठी मारणे. त्याच्या सहवासात खूप उत्साही वाटते. तो उत्साही व प्रामाणिक आहे आणि त्याचे नाव माझा आवडता देव भगवान शिव यांच्या नावावरून ठेवण्यात आले आहे. पाळीव प्राणी आपला मूड उत्साहित करू



शकतात आणि आपला दिवस आनंदमय करू शकतात, मग ते मांजराची सांत्वन करणारी गुरगुर असो किंवा कुत्रा आनंदाने त्याची शेपूट हलवत असो त्या क्षणांमधून खूप आनंद मिळतो. ते आपल्याला सर्वात मोठी शिकवण देतात ती म्हणजे क्षमा. नाराज असो किंवा उदास असो त्यांच्यामध्ये इतरांना माफ करण्याची क्षमता आहे. आणखी एक शिकवण म्हणजे अतूट प्रेम. ते आपल्या त्रुटी किंवा चुकांकडे दुर्लक्ष करत आपल्यावर बिनशर्त प्रेमाचा वर्षाव करतात. आपल्याला मन मोठे ठेवण्याची, इतरांवर मनापासून प्रेम करण्याची आणि कोणतीही आशा न बाळगता सहानुभूती, दयाळूपणा व स्वीकृती व्यक्त करण्याची शिकवण देतात.”

मालिका ‘भाबीजी घर पर है’मधील विदिशा श्रीवास्तव ऊर्फ अनिता भाबी म्हणाल्या,माझ्या मते आपण पाळीव प्राण्यांना निवडत नाही, तर ते आपल्याला निवडतात. तीन वर्षांपूर्वी माझ्या बाबतीत हे खरे ठरले. मी माझ्या घरामध्ये एका कुत्र्याला आणले आणि एकत्र हृदयस्पर्शी प्रवास सुरू झाला. त्याच्या अंगावरील सफेद फर आणि मनमोहक डोळे पाहून आम्ही त्याचे नाव ‘फॉक्सी’ ठेवले आणि तो अगदी सफेद कोल्ह्यासरखा दिसतो. त्याचे उत्साही व्यक्तिमत्त्व माझ्या जीवनात आनंद आणते आणि त्याच्या मागण्या पूर्ण होत नाही तोपर्यंत माझ्या मागे फिरत राहतो. या सर्व धमालीसह तो माझ्यासाठी तणाव दूर करणारा आणि अविरत सोबती आहे, जो त्याचे प्रेम व आनंदासह माझा दिवस उत्साहपूर्ण करतो. पाळीव प्राणी आपले जीवन उत्साहपूर्ण करतात, आपल्याला साहचर्य, सहानुभूती आणि जीवनात लहान-लहान क्षणांचा देखील आनंद घेण्याची शिकवण देतात. वर्ल्ड पेट डे निमित्त मानवजाती आणि त्यांचे केसाळ सोबती यांच्यामधील अतूट नात्याला साजरे करूया.”

## आयुषी खुराना व कशिश दुग्गल पडद्याच्या मागे आहेत जिवाभावाच्या मैत्रिणी

**आरंभ पर्व**

सोनी सबवरील ‘आंगन – अपनों का’ मालिकेत पल्लवी शर्मा (आयुषी खुराना)ची गोष्ट सांगितली आहे, जिचा लग्नाविषयी एक अनोखा दृष्टिकोन आहे. तिचे असे ठाम मत आहे की, लग्न झाल्यामुळे एका मुलीच्या आपल्या माता-पित्याच्या प्रती असलेली जबाबदारी संपत नाही. आकाश अवस्थी (समर वेरमानी)शी विवाहबद्ध झाल्यापासून पल्लवी आपली सासू अपर्णा अवस्थी (कशिश दुग्गल) हिचे मन आणि प्रेम जिंकण्याचा प्रयत्न करत आहे. पण तिच्या सासूचा मात्र हा ठाम समज झाला आहे की, पल्लवी आपल्या मुलाला आपल्यापासून हिरावून घेणार आहे.

मालिकेत पल्लवी आणि अपर्णायांच्यात उभा दावा असल्याचे दिसते. त्या एकमेकींच्या कट्टर शत्रू आहेत. पण पडद्याच्या मागे मात्र याच्या अगदी उलट चित्र दिसते. सेटवर त्या दोघी bff (बेस्ट फ्रेण्ड्स फॉरएव्हर) म्हणून ओळखल्या जातात. या दोघी जणी सेटवर अनेकदा गप्पांमध्ये रंगलेल्या



दिसतात, त्या एकत्र जेवतात आणि घरून सेटवर देखील एकत्रच येतात. जेव्हा आयुषी आपला डबा घरी विसरते, तेव्हा कशिश प्रेमाने तिच्यासाठी डबा घेऊन येते.जर पल्लवीला कधी बरे वाटत नसेल, तेव्हा कशिश ही काळजी घेते की पल्लवी वेळेवर जेवेल आणि व्यवस्थित आराम करेल. त्यांच्यातले नाते त्यांच्या सोशल मीडियावर देखील स्पष्ट दिसते, ज्यात या दोघी जणी बऱ्याचदा त्यांच्या डान्सच्या रील्स आणि मस्तीची छायाचित्रेपोस्ट करत असतात.

अपर्णाची भूमिका करणारी कशिश दुग्गल म्हणते, “माझे आणि आयुषीचे नाते घट्ट आहे, कारण ते अस्सल आहे. एकमेकींबद्दलचा आदर आणि समजूतदारपणा यावर ते उभे आहे, जसे आजकाल क्वचितच बघायला मिळते. आयुषी केवळ एक सह-कलाकार नाही; ती माझा मोठा आधार आहे. ती नेहमी शांत आणि स्थिर असते. माझे सगळे बोलणे ती शांतपणे, न कंटाळता ऐकून घेते. कामाच्या ठिकाणी किंवा सेटवरून परत जाताना आम्ही एकमेकींच्या सोबत असतो, तो वेळ फार मौल्यवान आणि आमच्या दोघींचाच असतो. हे खूप सुंदर नाते आहे, जे मला आनंद देते. पडद्यावर आम्ही दोघी एकमेकींच्या शत्रू आहोत, पण पडद्याच्या मागची आमची मैत्री खरोखर विलक्षण आहे.”

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.